## निधन वार्ता

### रामदास चिंचोले



औरंगाबाद : मराठवाडा शिक्षक संघटनेचे माजी पदाधिकारी व गुजराती कन्या प्रशालेचे माजी शिक्षक रामदास चिंचोले यांचे आज निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई, असा परिवार आहे. सायंकाळी चिकलठाणा स्मशानभूमीत चिंचोले यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. औरंगाबाद विभाग खाजगी माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेचे चिंचोले हे संस्थापक अध्यक्ष होते. दिवंगत शिक्षक आमदार दस्तुरकर व वसंत काळे यांच्यासमवेत त्यांनी काम केले होते. बालविकास अकादमी स्थापन करून चिंचोले यांनी बालकामगारांच्या क्षेत्रातही चांगले कार्य केले होते. चिकलठाणा स्मशानभूमीत झालेल्या शोकसभेत किरण मास्ट, एस. पी. जवळकर, मिर्झा सलीम बेग, प्रकाश वाघमारे आदींनी शोकसंवेदना व्यक्त केल्या.

### शिवनाथ शेजूळ



औरंगाबाद : चिकलठाणा येथील रहिवासी शिवनाथ बापूराव शेजूळ (६0) यांचे शुक्रवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ मुली असा परिवार आहे. शनिवारी चिकलठाणा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### रंगनाथ आघाडे



करमाड : रंगनाथ रामचंद्र आघाडे (५५) यांचे शनिवारी दुपारी ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, भाऊ असा परिवार आहे. त्यांच्यावर शनिवारी रात्री करमाड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### मिर्झा मकसूद बेग



औरंगाबाद : मिर्झा मकसूद बेग हमीद बेग (४५, रा. सिल्कमिल कॉलनी) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, तीन मुले असा परिवार आहे.

### शकुंतलाबाई निवाथे



औरंगाबाद : रामनगरातील रहिवासी शकुंतलाबाई रामचंद्र निवाथे (६२) यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. रविवारी सकाळी ११ वा. मुकुंदवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

### लक्ष्मण त्रिभुवन



औरंगाबाद : मुकुंदवाडी येथील रहिवासी लक्ष्मण त्रिंबक त्रिभुवन यांचे निधन झाले. यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, १ मुलगा असा परिवार आहे.

कारचालकाचे प्रसंगावधान : सुदैवाने जीवित हानी नाही

# धावती कार पेटली; उरला केवळ सांगाडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : अमरप्रीत** चौकाकडून दर्गा चौकाकडे जाणारी इंडिका कार एका खाजगी रुग्णालयाजवळ अचानक जळून खाक झाली. यावेळी प्रसंगावधान राखून चालकाने कार रस्त्याशेजारी उभी करून उतरल्याने बालंबाल बचावला. ही घटना शनिवारी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास घडली.

पोलिसांनी सांगितले की, देवळाई परिसरातील म्हाडा कॉलनी येथील रहिवासी आनंद बोर्डे कार घेऊन क्र. (एमएच-२० एए २५६६) अमरप्रीत चौकाकडून बीड बायपासकडे जात होते.

शहानूरमियाँ दर्गा चौकाजवळील एका खाजगी रुग्णालयासमोर ते असताना अचानक कारमधून धूर निघत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी प्रसंगावधान राखून तातडीने कार रस्त्याच्या डाव्या बाजूला उभी केली आणि ते कारमधून उतरले. यानंतर काही क्षणात कारने पेट घेतला.

यावेळी प्रत्यक्षदर्शींनी कारची आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र गाडीने जास्त पेट घेतल्याने काही मिनिटांच्या कालावधीत संपूर्ण कार जळून खाक झाली. या आगीचे कारण मात्र समजू शकले नाही. घटनेची माहिती मिळताच जवाहरनगर आणि उस्मानपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.



दर्गा रोडवर पेटलेल्या कारचा सांगाडा.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाळूज महानगर :** वाळूज एमआयडीसी परिसरातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या अज्ञात अपहरणकर्त्याविरुद्ध एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, भारती अनिल मुटकुळे (१७, रा. मुशदरपूर, ता.आष्टी, जि.बीड) ही अल्पवयीन मुलगी दोन महिन्यांपूर्वी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी वाळूज एमआयडीसीत आली होती. या परिसरात एका खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रशिक्षण घेत असताना १६ नोव्हेंबरला तिचे नातेवाईक भारतीला भेटण्यासाठी आले असता भारती १४ नोव्हेंबरला गावाकडे जात आहे, असे म्हणून क्लासमधून निघून गेल्याचे त्यांना समजले. भारती मुटकुळे ही अचानक बेपत्ता झाल्यामुळे तिच्या नातेवाईकांनी परिसरात सर्वत्र शोध घेतला; मात्र कुठेही मिळून आली नाही. त्यामुळे तिचे वडील अनिल मुटकुळे यांनी मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार दिली आहे. याप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात अज्ञात अपहरणकर्त्याविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोहेकॉ.आर.डी. राजपूत करीत आहेत.




यात्रेच्या दुसऱ्या दिवशी ग्रामीण भागातील भक्तांची गर्दी होती. भक्तिभावे पूजा अर्चा करताना ग्रामीण भक्त.

# सातारा यात्रेत दुसऱ्या दिवशीही गर्दी

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** सातारा परिसरातील खंडोबा मंदिरात यात्रेच्या दुसऱ्या दिवशी भाविकांच्या पहाटेपासून रांगा दिसल्या. शनिवारी ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबांनी मुक्काम ठोकला असून, रविवारी अनेकांनी कंदुरीचा बेत दर्शविला आहे. सरकारी व निमसरकारी कार्यालयांना सुटी असल्याने शहरी भक्तात अधिकारी व कर्मचारी कुटुंबांसह यात्रोत्सवात सहभागी होणार आहेत.

रविवारी (दि.२६) रोजी शाळा, कार्यालयाला सुटी असल्याने ते कुटुंबासह दर्शनाचा तसेच ग्रामीण भागातून आलेल्या पाहुण्यांची कंदुरी असल्याने अगत्याचे निमंत्रण दिलेले असते. विद्यार्थ्यांना शाळेशिवाय यात्रेचे वेगळेच आकर्षण असून, टीव्ही, मोबाइल, संगणकावर अथवा सिनेमात दाखविणाऱ्या यात्रा प्रत्यक्षात पाहण्याचा मोह चिमुकल्यांना आवरता येत नाही. मुलांच्या आग्रहाखातर पर्यटनाला जाण्याऐवजी यात्रोत्सवात हजेरी लावण्यावर पालकांचाही भर दिसून येत आहे. शनिवारी चारचाकी व खेड्यातून काळी-पिवळी तसेच टेम्पो, ट्रॅक्टरने भाविक डेरेदाखल झालेले आहेत. राज्यात कानाकोपऱ्यात असलेल्या सातारा देवळाई परिसरातील जी कुटुंबे दिवाळीसाठी आली नाही, ते मुद्दाम यात्रेसाठी सुटीत दाखल होतात. लेकीबाळीचा व जावयांचादेखील यात्रेनिमित्त सन्मान सातारा परिसरात केला जातो, असे ट्रस्टचे अध्यक्ष साहेबराव पळसकर, सचिव गंगाधर पारखे, पुजारी दिलीप धुमाळ यांनी सांगितले.



ऑरा औरंगाबाद महोत्सवामध्ये 'पशुनाम' ही ओडिसी नृत्य प्रस्तुती सादर करताना महागामीच्या शिष्य कलावंत.

# ओडिसी नृत्यातून साकारल्या रामायणाच्या छटा

**महागामी : ऑरा औरंगाबाद नृत्य महोत्सव**

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : महागामीतर्फे** आयोजित 'ऑरा औरंगाबाद' नृत्य महोत्सवामध्ये शनिवारी (दि.२५) सादर झालेल्या नृत्याविष्कारातून पदन्यास, लयबद्ध हालचाल आणि बोलक्या अभिनयाचा बेजोड मिलाफ पाहायला मिळाला. संचालिका पार्वती दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली महागामीतील शिष्यांनी ओडिसी नृत्यातून रामायणातील अनेक प्रसंग सादर करण्यात आले. संस्थेच्या शारंगधर सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

बाहेर दिव्यांची आरास आणि थंडीची हलकी हलकी चाहूल लागलेली असताना मैफलीचा प्रारंभ झाला. सुरुवातीला महादेवाला अर्पण 'शिव वंदना' सादर झाली. त्यानंतर महादेवाच्या स्वभावातील विविध छटा दाखवणारे नृत्य प्रस्तुती करण्यात आली. कल्याणी रागातील रचनेवर 'कल्याणी पल्लवी' ही प्रस्तुती मंचावर अविष्कृत करण्यात आली.

यानंतर रामायणातील विविध प्रसंगांना आपल्या नृत्याभिनयातून मंचित करून रसिकांची दाद मिळविली. वेरूळ लेणीतील विविध शिल्पांपासून प्रेरणा घेऊन पार्वती दत्ता यांनी तयार केलेल्या या प्रस्तुतीमध्ये वनवासाला निघालेले राम, सीता, लक्ष्मण, शूर्पनखाचे नाक कापणे, सीताहरण, अशोक वाटिकेत हनुमानाची सीता भेट, राम-रावण युद्ध आणि राम विजयोत्सव आदी प्रसंग साकारण्यात आले.

याव्यतिरिक्त मैफलीमध्ये सावेरी पल्लवी, पशुनाम आणि मणीपद्म यावर आधारित रचनांवर ओडिसी नृत्य सादर करण्यात आले.

# मतपेट्यातून उघडणार आज उमेदवारांचे भवितव्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेतील पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर रविवारी (दि.२६) सकाळी दहा वाजेपासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. यासाठीची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. साधना पांडे यांनी दिली. मतपेट्यांमध्ये बंद झालेल्या मतपत्रिकांमधून उमेदवारांचे भवितव्य उघडणार आहे. उत्कर्ष पॅनल, विद्यापीठ विकास मंच आणि बामुक्टो संघटनेने बहुमताने विजयी होण्याचा दावा केला आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेतील महाविद्यालयीन प्राध्यापक, विद्यापीठ प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक आणि विद्यापरिषद गटासाठी चार जिल्ह्यांतील २० मतदान केंद्रांवर शुक्रवारी (दि. २४) मतदान झाले. या मतदानाची मतमोजणी रविवारी सकाळी विद्यापीठातील महात्मा फुले सभागृहात सकाळी दहा वाजता सुरू होणार आहे. यात पहिल्यांदा संस्थाचालक, प्राचार्य, विद्यापीठ प्राध्यापक गटात मतदारांची संख्या कमी असल्यामुळे सुरुवातीला मतमोजणी होईल, असे नोडल अधिकारी डॉ. सुनील देशपांडे यांनी सांगितले. महाविद्यालयातील प्राध्यापक गटात मतसंख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र टेबल मांडण्यात येणार आहे. मतमोजणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध केल्या आहेत. सर्व निकाल माईकवर सांगण्यात येणार असून, उमेदवार किंवा त्यांचा एक प्रतिनिधी मतमोजणी केंद्रात येऊ शकतो. यासाठी संबंधित उमेदवाराला सकाळी नऊ वाजताच प्रतिनिधीचे नाव द्यावे लागणार असल्याचे डॉ. देशपांडे म्हणाले. मतमोजणी केंद्राच्या सुरक्षेसाठी पुरेशा प्रमाणात पोलीस सुरक्षा घेण्यात आली आहे.



डॉ. अश्विनी भिडे



पं. रामदास पळसुले

## गंधर्व संगीत महोत्सवाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : शासकीय** ज्ञान-विज्ञान महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे सोमवार, दि.४ डिसेंबर रोजी सायं. ५ वा. गंधर्व संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे हे दुसरे वर्ष असून, यादरम्यान कल्याण अपार यांचे शहनाई वादन, पं. रामदास पळसुले यांचे एकल तबलावादन आणि डॉ. अश्विनी भिडे- देशपांडे यांच्या शास्त्रीय गायनाचा आस्वाद रसिकांना घेता येईल. प्रवेश विनामूल्य असून, शहरातील सर्व रसिकांनी तसेच संगीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्या डॉ. रोहिणी पांढरे व संगीत विभागप्रमुख डॉ. वैशाली देशमुख यांनी केले.

## वाणिज्य वार्ता

### गुरुकुलच्या वतीने आज चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : इयत्ता** ७ वी ते १० वीत शिकत असलेले विद्यार्थी व पालकांसाठी गुरुकुल क्लासेसच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी 'हाऊ टू बी अ सुपर स्टुडंट' या विषयावरील 'लक्ष्य-२०१७' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडको एन-५ येथील संत तुकाराम नाट्यगृह येथे सकाळी ११ वाजता चर्चासत्राला सुरुवात होणार आहे. एज्युकेशन हब समजल्या जाणाऱ्या कोटा येथील ख्यातनाम मोटिव्हेशनल स्पीकर सौरभ मिश्रा हे मार्गदर्शन करणार आहेत, तसेच गुरुकुल क्लासेसचा सुपर स्टुडंट ओंकार देशपांडे ज्याने आयआयटी (जेईई अॅडव्हान्स) परीक्षेत देशात ८ वा क्रमांक मिळविला आहे. तो स्वत: विद्यार्थ्यांशी हितगुज करणार आहे. प्रवेश नि:शुल्क असून, कार्यक्रमाच्या पासेस गुरुकुल क्लासेसच्या सर्व शाखांवर उपलब्ध आहेत. या चर्चासत्राची सुवर्णसंधी विद्यार्थी व पालकांनी सोडू नये, असे आवाहन गुरुकुलचे संचालक प्रा. निर्मल बिस्वाल यांनी केले आहे.

### मित्तल ऑप्टिक्स बनले देशातील नंबर वन

लोकमत न्यूज नेटवर्क



नीलेश मित्तल

**औरंगाबाद : भारतातील** सर्वांत सुंदर ऑप्टिकल्स स्टोअर्स म्हणून शहरातील कॉल्डा कॉर्नर येथील मित्तल ऑप्टिक्सची निवड झाली आहे. ऑप्टिकल्स क्षेत्रातील देशातील नामांकित पुरस्कार 'यू अॅण्ड आय' नुकताच प्रदान करण्यात आला. यामुळे ऐतिहासिक औरंगाबादनगरीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोचल्या गेला आहे.

ऑप्टिकल्स क्षेत्रातील 'यू अॅण्ड आय' ही एकमेव कंपनी आहे. तिच्या वतीने भारत व दुबाई येथील बेस्ट ऑप्टिकल्सला पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. शहरातील मित्तल ऑप्टिक्स असे शोरुम आहे ज्याची मराठवाड्याच्या इतिहासात पहिल्यांदाच या पुरस्काराच्या नामांकनात नोंद झाली. यापुढे जाऊन देशातील नंबर वन म्हणून पुरस्कारही मिळाला. नुकतेच नवी दिल्ली येथील सोहळ्यात झेईस इंडिया लिमिटेडचे भारतातील प्रमुख राहुल खेतावत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार 'डिस्प्ले' आणि 'डिझाइन' कॅटॅगिरीत देण्यात आला. कॉल्डा कॉर्नर येथे मित्तल ऑप्टिक्सला डिसेंबर २०१६ मध्ये सुरुवात झाली. शहरात मित्तल ऑप्टिकल्सच्या ५ शाखा कार्यरत आहेत. १९६७ मध्ये राधेश्याम मित्तल यांनी हा व्यवसाय शहरात सुरु केला. आज त्यांचे पुत्र व मित्तल ऑप्टिक्सचे संचालक नीलेश मित्तल हे व्यवसाय तेवढ्याच ताकदीने सांभाळत आहेत. नीलेश मित्तल यांनी सांगितले की, मित्तल ऑप्टिक्स सुरु करण्यापूर्वी आम्ही दुबई, मलेशिया, सिंगापूर व युरोपचा दौरा करून तेथील ऑप्टिकल्सच्या शोरूमचा अभ्यास केला. येथे आर्किटेक गोपाल तनवाणी व श्रुती तनवाणी यांनी शोरुमचे अत्याधुनिक डिझाइन तयार केले. प्रशिक्षित कर्मचारी व तत्पर सेवा तसेच विक्रीपश्चात सेवा हे वैशिष्ट्य ठरत आहे.

देशातील नंबर वन शोरुम म्हणून मित्तल ऑप्टिक्सची निवड झाली. हा आमच्यासाठी व शहरवासीयांसाठी अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया नीलेश मित्तल यांनी व्यक्त केली.

# बजाजनगरात दुचाकीच्या धडकेत वृद्ध महिला ठार

लोकमत न्यूज नेटवर्क



रुख्माबाई नारखेडे

**वाळूज महानगर : भरधाव** दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या ८३ वर्षीय वृद्ध महिलेचा शनिवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

रुख्माबाई सदाशिव नारखेडे (६३, रा.बजाजनगर) या शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास घरासमोर असलेल्या श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिरासमोरील रस्त्यावरून जात असताना त्यांना अज्ञात दुचाकीस्वाराने जोराची धडक दिली. या अपघातात रुख्माबाई नारखेडे यांच्या हाताला व पायाला जबर मार लागला या अपघाताची माहिती मिळताच त्यांचा मुलगा गजानन नारखेडे यांनी गंभीर जखमी अवस्थेत आईला खाजगी रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरु असताना शनिवारी सकाळी १०.१५ वाजेच्या सुमारास रुख्माबाई यांची प्राणज्योत मालवली.

## बारी समाज उपवधू-वर परिचय मेळाव्याचे आज आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** बारी समाजातील उपवधू-वर परिचय राज्यस्तरीय मेळावा उद्या २६ नोव्हेंबर रोजी टीव्ही सेंटर रोडवरील डॉ.मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे सकाळी १० ते ५ या वेळात होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून भगवान पायघन (आरएफओ) व भाजपचे जालना जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पवार यांची उपस्थिती राहणार आहे. समाजातील लग्न इच्छुकंनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. आर. बी. आसवार व सचिव वसंत धुळे यांनी केले आहे.

पान १ वरुन

## मराठवाड्यात पहिले यकृत प्रत्यारोपण

नाराजी व्यक्त केली.

**...अन् हृदयाची धडधड थांबली**

मुंबई-पुण्यासह देशातील सर्व प्रत्यारोपण करणाऱ्या रुग्णालयांना अवयवदान प्रक्रियेची माहिती देण्यात आली.

हृदय चेन्नईला पाठवण्यासाठी हालचाली झाल्या; परंतु हृदयदान करता आले नाही. हृदयदानासाठी विमानसेवेपोटी येणारा खर्च उचलण्याची तयारीही आसावा कुटुंबियांनी दर्शविली. शहरात एअर अॅम्ब्युलन्सची सेवा उपलब्ध नसल्यानेही अडचण झाली. एअर अॅम्ब्युलन्स उपलब्ध झाली असती तर कुठेतरी हृदय प्रत्यारोपण शक्य झाले असते, असे डॉ. सुधीर कुलकर्णी म्हणाले.

## ट्रू जेटचे विमान डिसेंबरमध्ये...

औरंगाबाद-हैदराबाद-तिरुपती विमानसेवा सुरु करण्यात आली.

औरंगाबादहून तिरुपतीला जाणाऱ्या बालाजी भक्तांना आणि हैदराबादहून शिर्डीला साई दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची या विमानसेवेने मोठी सुविधा झाली.

एक प्रकारे दोन्ही धार्मिक स्थळे हवाई मार्गाने जोडली गेली. या विमानसेवेला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे; परंतु डिसेंबरमध्ये मर्यादित सेवेमुळे प्रवाशांना गैरसोयीला सामोरे जावे लागणार आहे.

## काल म्हणाले अटक झाली...

माहिती पुंडलिकनगर ठाण्याचे निरीक्षक अशोक मुदीराज यांनी दिली. शहरातील सर्व प्रसारमाध्यमांनी या बाबतचे वार्तांकन केले. आज शनिवारी या घटनेतील अटक महिलेला कोर्टात हजर केले का, अशी विचारणा अधिकाऱ्यांना करण्यात आली असता त्या महिलेस अटक करण्यात आली नसल्याचे या गुन्ह्याचा तपास करणारे सहायक पोलीस निरीक्षक अशोक आव्हाड यांनी सांगितले. ते म्हणााले की, सिव्हिल सर्जन यांच्याकडून याबाबत शुक्रवारी सायंकाळी पोलिसांना अहवाल प्राप्त झाला. नियमानुसार महिलांना रात्री अटक करता येत नाही, यामुळे काल आरोपी महिलेस अटक करण्यात आली नव्हती. आज दिवसभर आरोपी नर्स महिलेचा शोध घेतला असता ती सापडली नाही. आम्ही युद्धपातळीवर तिचा आणि अन्य आरोपींचा शोध घेत आहोत.